ePaper
ठाणे, रायगडमध्ये भट्टी पेटली, महामुंबई परिसरात उष्णतेची लाट कायम

| वर्ष - 6 । अंक - 359 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | । बुधवार दि. 19 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत

- होर्डिंग दुर्घटनेनंतर प्रशासनाला आली जाग
- काँग्रेसचे जवाब दो मोदी... आंदोलन!
- जीवात जीव असेपर्यंत राष्ट्रवादीमध्येच
- यूपीत उत्तम कायदा सुव्यवस्था

### बेकायदा होर्डिंग अन् स्ट्रक्चरल ऑडिटचा प्रश्न ऐरणीवर

# प्रशासनाचा बेजबाबदारपणा?

## » लोकप्रतिनिधींची मागणी : आयुक्तांच्या भूमिकेकडे लक्ष

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरात मोठ्या संख्येने अनधिकृत होर्डिंग आहेत. त्याकडे महापालिका प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. अनधिकृत होर्डिंग काढण्यासाठी निविदा काढण्यात आली. पण, न्यायालयाचे कारण पुढे करून महापालिका त्याकडे दुर्लक्ष करत आहे. शहरातील सगळे अनधिकृत होर्डिंग काढण्यात यावे. ज्या होर्डींगला परवानगी आहे त्यांचे स्ट्रक्चर ऑडिट करण्याबाबत महापालिका प्रशासनाचा हलगर्जीपणा होत आहे, अशी टीका शहरातील लोकप्रतिनिधीकडून होत आहे.**



वादळी वा-यासह होणा-या पावसापासून बचाव करण्यासाठी आडोशाला थाबलेल्या व्यक्तीच्या अंगावर किवळे येथे होर्डिंग पडल्याने पाच जणांचा मृत्यू झाला. यात मृत व जखमी झालेले व्यक्ती हे सर्वसाधारण कुटुंबातील आहे. त्यांच्या कुटुंबियांना राज्यशासनाने मदत केली आहे. पण, महापालिकेने ही काही मदत करावी, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे.

शहरात अनाधिकृत होर्डिंगचे पेव फुटले आहे. शहराच्या सर्व भागात होर्डिंग दिसतात. त्यातील जवळपास 2200 होर्डिंग हे अनाधिकृत आहेत. महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता शहरात असे होर्डिंग उभारले जात आहेत. याकडे महापालिका प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष आहे. यामध्ये प्रशासन व अनाधिकृत होर्डिंग मालक याचे आर्थिक देणेघेणे असल्याचे दिसून येते, यावर कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. याबाबत लोकप्रतिनिधी आणि नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

### अनधिकृत होर्डिंग तात्काळ हटवा : श्रीरंग बारणे



» शहरातील अनधिकृत होर्डिंग काढण्यासाठी निविदा काढण्यात आली होते. केवळ न्यायालयाचे कारण पुढे करून महापालिका त्याकडे दुर्लक्ष करत आहे. शहरातील सगळे अनधिकृत होर्डिंग काढण्यात यावे. ज्या होर्डिंगला परवानगी आहे त्यांचे स्ट्रक्चर ऑडिट करावे. भविष्यात कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी पुरेशी काळजी घ्यावी. किवळे येथील दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करावी. जखमींचा पूर्ण खर्च महापालिकेने करावा. यापुढे महापालिकेने मुख्य चौकांमध्ये अपघात होईल अथवा नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होईल अशा ठिकाणी होर्डिंगला परवानगी देऊ नये, अशी सूचना खासदार श्रीरंग बारणे यांनी केली आहे.

### सर्व होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट करणार : आयुक्त सिंह



शहरातील अधिकृत 1 हजार 407 अधिकृत होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येणार असल्याचे महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले. यावेळी अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ, प्रदीप जांभळे उपायुक्त रविकिरण घोडके,वैद्यकीय विभागप्रमुख डॉ. लक्ष्मण गोफणे उपस्थित होते. किवळे येथे मोठे अनधिकृत होर्डिंग कोसळून पाच जणांचा मृत्यू झाला. तर तिघे जण गंभीर जखमी झाले आहेत. एका जखमीला उपचार करून रूग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. तर, दोघांवर खासगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांच्या उपचारावर महापालिकेचे लक्ष आहे.

या होर्डिंग दुर्घटनेनंतर खडब़डून जागे झालेल्या पालिका प्रशासनाने शहरातील सर्व (त्यांच्या लेखी फक्त १४०७) होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचा निर्णय आज घेतला. दरम्यान, या होर्डिंग दुर्घटनेनंतर शहरातील सर्वच राजकीय पक्षांनी पालिका प्रशासन तथा प्रशासकांना आज लक्ष्य केलं. अनधिकृत होर्डिंग्जचे ऑ़डिट करण्याची मागणी त्यांनी केली. तर, मुंबई उच्च न्यायालयाच्या स्थगितीमुळे बेकायदेशीर होर्डिंग्ज विरुद्धची कारवाई रखडल्याची पळवाट आयुक्तांनी शोधली.



**“ कोसळलेले जाहिरातीचे होर्डिंग हे अधिकृत होते की अनधिकृत होते ? सदर जाहिरातीचे होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडीट केले होते का? याचीसुध्दा सविस्तर माहिती जनतेसमोर आली पाहिजे. यापुढे अश्या घटना घडू नये यासाठी उपाययोजना / तांत्रिकपद्धतीने भक्कम होर्डींग्स उभे करण्याचे धोरण तातडीने तयार करण्यात यावे.**

**- सीमा सावळे, माजी स्थायी समिती सभापती.**



**“ मृत व्यक्तींच्या वारसांना पाच लाख रुपये व जखमींना दोन लाख रुपये मदत महापालिकेने द्यावी. निष्पाप नागरिकांचा नाहक बळी गेला आहे. यास सर्वस्वी मनपा जबाबदार असून बेकायदा, दोन मजली तसेच निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून उभे केलेले जाहिरात फलक हे मनपा आकाशचिन्ह विभागातील खाबुगिरीचे दर्शन आहे.**

**- अण्णा बनसोडे, आमदार, पिंपरी.**

# महावितरणकडून सुरक्षा ठेवींचा शॉक!

## » अतिरिक्त सुरक्षा ठेवींची बिलं, 'त्या' ग्राहकांना प्रीपेड मीटरचाही पर्याय

।पिंपरी।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

**महावितरणने राज्यातील सर्व वीज ग्राहकांना एप्रिल महिन्यात वीज बिलांसोबत अतिरिक्त सुरक्षा ठेवींची बिले पाठविली असून, ती एकरकमी अथवा सहा मासिक हप्त्यांमध्ये भरता येणार आहे. आर्थिक अडचणींमुळे अतिरिक्त सुरक्षा ठेवींची बिले भरणे शक्य नसल्यास वीस किलोवॅटपेक्षा कमी जोडभार असलेल्या ग्राहकांना प्रीपेड मीटरच्या मागणीचा पर्यायही उपलब्ध आहे. प्रीपेड मीटरवर कोणतीही सुरक्षा ठेव भरावी लागत नाही; तसेच वीजदरात दोन टक्के सवलतही मिळते, अशी माहिती वीजतज्ज्ञांनी दिली.**



राज्यातील सर्व वीजग्राहकांना चालू वीजबिलासोबत अतिरिक्त सुरक्षा ठेव मागणीची संपूर्ण रकमेची बिले देण्यात आली आहेत. त्यावरून ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

वास्तविक महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या वीजपुरवठा संहितेनुसारच वीजग्राहकांकडून अतिरिक्त सुरक्षा ठेव आकारली जाते. यापूर्वी सुरक्षा ठेवीची रक्कम एका महिन्याच्या बिलाइतकी होती. मात्र, नवीन नियमांनुसार एप्रिल २०२२ पासून ती दुप्पट म्हणजे दोन महिन्यांच्या बिलाइतकी करण्यात आली आहे. त्यानुसार, गेल्या वर्षी एप्रिल २०२२ मध्येही अतिरिक्त सुरक्षा ठेव मागणीची बिले आली होती. त्यावेळी ज्यांनी भरणा केला नाही, त्यांना यंदाच्या वर्षी पुन्हा बिले पाठविण्यात आली आहेत.

'राज्य वीज नियामक आयोगाने अतिरिक्त सुरक्षा ठेवींची बिले भरण्यासाठी सहा हप्त्यांची सवलत दिली आहे. महावितरणने वीजग्राहकांना दिलेल्या अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम सहा समान मासिक हप्त्यांमध्ये भरता येईल, अशी माहिती बिलामध्ये इंग्रजी भाषेत दिली आहे,' असे महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष प्रताप होगाडे यांनी सांगितले.

### प्रीपेड मीटरसाठी सुरक्षा ठेव आवश्यक नाही

**» 'अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम एकरकमी किंवा सहा मासिक हप्त्यांमध्ये भरणे शक्य नाही, अशा ग्राहकांसाठी प्रीपेड मीटरचा पर्यायही उपलब्ध आहे. प्रीपेड मीटरसाठी सुरक्षा ठेव आवश्यक नाही. मात्र, वीस किलोवॅटपेक्षा कमी जोडभार असलेल्या ग्राहकांनाच प्रीपेड मीटरसाठी अर्ज करता येणार आहे. अशा वीजग्राहकांनी प्रीपेड मीटर घेतल्यास, सध्याची जमा सुरक्षा अनामत रक्कम त्यांच्या प्रीपेड खात्यामध्ये वर्ग केली जाईल. त्यातून त्यांच्या पुढील वीज वापराची रक्कम वजा केली जाते, तसेच वीज आकार व इंधन समायोजन आकारात अतिरिक्त दोन टक्के वीजदर सवलतही मिळते,' असेही त्यांनी सांगितले.**

### प्रीपेड मीटरसाठी इथे करा अर्ज

**» 'प्रीपेड मीटरसाठी वीस किलोवॅटपेक्षा कमी जोडभार असलेल्या वीजग्राहकांना संबंधित विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे अर्ज करता येईल. संबंधित कार्यालयाकडून अर्जावर सही शिक्क्याची पोचपावती घ्यावी. त्यानंतर महावितरण अतिरिक्त सुरक्षा ठेवींसाठी सक्ती करू शकत नाही. बिले भरण्यासाठी कोणता पर्याय निवडायचा हा वीजग्राहकांचा हक्क असून, महावितरणला ग्राहकांची कोणत्याही पर्यायाची मागणी नाकारता येणार नाही,' असे वीजतज्ज्ञ प्रताप होगाडे यांनी सांगितले.**



# हवामान बदलामुळे साखर उत्पादन घटले

## » यंदा हंगामात 105 लाख टन उत्पादन

।पुणे।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

**पुणे : राज्यात १५ ऑक्टोबरला सुरू झालेला साखर हंगाम मंगळवारी, १८ एप्रिल रोजी आटोपला. २१० साखर कारखान्यांनी १०५ लाख टन साखर उत्पादन केले आहे. मागील वर्षीपेक्षा ३२ लाख टनांनी साखर उत्पादन घटले आहे. राज्यात मागील वर्षी १३७.२८ लाख टन साखर उत्पादन झाले होते. यंदा लागवडीखालील क्षेत्र गेल्या वर्षाएवढेच असल्यामुळे यंदा १३५ लाख टन साखर उत्पादन होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला होता. मात्र, प्रत्यक्षात साखर उत्पादन १०५ लाख टनांपर्यंतच होऊ शकले.**



राज्यातील उसाचा गळीत हंगाम १५ ऑक्टोबर रोजी सुरू झाला होता. परतीचा मोसमी पाऊस लांबल्यामुळे गळीत हंगामाला दिवाळीनंतरच गती आली होती. १०६ सहकारी आणि १०४ खासगी अशा २१० साखर कारखान्यांनी या हंगामात साखर उत्पादन केले आहे. कोल्हापूर, सोलापूर, पुणे विभागातील बहुतेक कारखान्यांची धुराडी मार्चअखेरीस बंद झाली होती.

राज्यातील सर्व कारखाने मंगळवारी बंद झाले आहेत. २१० कारखान्यांनी एकूण १०५ लाख टन साखर उत्पादन केले आहे. हवामान बदलामुळे उसाचे वजन कमी भरले आहे. कारखान्यांची एकूण दैनिक गाळपक्षमता आठ लाख टनांवर गेल्यामुळे हंगाम वेळेत संपला आहे.

### उत्पादन का घटले ?

**» यंदाच्या पावसाळय़ात जुलैअखेरपासून नोव्हेंबरच्या पहिल्या आठवडय़ापर्यंत सतत पाऊस पडत होता. सततच्या पावसामुळे उसाची अपेक्षित वाढ झाली नाही. अपेक्षित वजन, गोडी भरली नाही. राज्यात गेल्या वर्षाएवढेच १४८७ लाख हेक्टरवर यंदाही ऊस होता. मात्र, नव्याने लागवड केलेल्या आणि खोडवा उसाचे वजन सरासरीच्या पंधरा ते वीस टक्के कमी भरले आहे. सोलापूर, बीड, उस्मानाबाद विभागात वजनात मोठी तूट आली आहे.**

# पुणे जिल्ह्यातील बारा शाळा अनधिकृत

।पुणे ।महाईन्यूज।
प्रतिनिधी।



पुणे: जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने अनधिकृत शाळांची यादी जाहीर केली. त्यानुसार जिल्ह्यात एकूण बारा अनधिकृत शाळा असून, सर्वाधिक चार शाळा हवेली तालुक्यात आहेत. संबंधित शाळांमध्ये प्रवेश न घेण्याचे आवाहनही करण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनी अनधिकृत शाळांची यादी प्रसिद्ध केली. शासनाची मान्यता न घेता, कागदपत्रांची पूर्तता न करता शाळा चालवल्या जात असल्याची प्रकरणे गेल्या काही काळात समोर आली. त्यामुळे शिक्षण अधिकाऱ्यांनी सर्वेक्षण करून अहवाल सादर केला. त्यानुसार बारा शाळा अधिकृतपणे सुरू असल्याचे समोर आले आहे. अनधिकृत शाळा पुरंदर, खेड, दौंड, मुळशी आणि हवेली तालुक्यांतील आहेत. त्यात सर्वाधिक चार शाळा हवेली तालुक्यातील आहेत.दौंड तालुक्यातील मंगेश मेमोरियल इंटरनॅशनल स्कूल, कासुर्डी येथील क्रेयांस प्री प्रायमरी स्कूल, बेटवाडी येथील के. के. इंटरनॅशनल स्कूल, हवेली तालुक्यातील किरकीटवाडी येथील कल्पवृक्ष इंग्लिश मिडीयम स्कूल, कोल्हेवाडी येथील क्रेझ इंग्लिश मिडीयम स्कूल, खडकवासला येथील किंडर गार्डन इंग्लिश मिडीयम स्कूल, लोणी काळभोर येथील पुणे इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, खेड तालुक्यातील भोसे येथील जयहिंद पब्लिक स्कूल, बावधन येथील एस. एन. बी. पी. टेक्नो स्कूल, मुळशी तालुक्यातील जांभे येथील अंकुर इंग्लिश स्कूल, नेरे येथील साई बालाजी पब्लिक स्कूल, पुरंदर तालुक्यातील वीर येथील श्रीनाथ इंग्लिश मिडीयम स्कूल या शाळा अनधिकृत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

पालकांनी आपल्या पाल्याला संबंधित अनधिकृत शाळेत दाखल करू नये.

# काँग्रेसचे जवाब दो मोदी... आंदोलन!

## » तहसीलदारांना निवेदन : सत्यपाल मलिक यांच्या आरोपांमुळे काँग्रेस

।पिंपरी।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

**भाजपाचे वरिष्ठ नेते, जम्मू काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी पुलवामा घटना व ३०० कोटीच्या ऑफरचा केलेला आरोप अत्यंत गंभीर आहे. सत्यपाल मलिक यांनी केलेले आरोप भ्रष्टाचार व देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत चिंताजनक आहे. पुलवामा घटनेमध्ये ४० जवानांचे बळी गेले आणि त्यात सरकारची चूक असणे हे निदर्शनास आणून दिले असता पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांना गप्प रहाण्यास सांगितले. या आरोपांवर पंतप्रधानांची अळीमिळी गुपचिळी का? असा सवाल पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. कैलास कदम यांनी केला.**

डॉ. कैलास कदम यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी चिंचवड शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने सोमवारी (१७ एप्रिल) निगडी येथे ‘जबाब दो मोदी जबाब दो’ आंदोलन करण्यात आले. त्यानंतर अप्पर तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी माजी नगरसेवक विश्वास गजरमल, महिला अध्यक्षा सायली नढे, वरिष्ठ उपाध्यक्ष नरेंद्र बनसोडे, पिंपरी ब्लॉक अध्यक्ष विश्वनाथ जगताप, चिंचवड ब्लॉक अध्यक्ष ज्ञानेश्वर मलशेट्टी, भोसरी ब्लॉक अध्यक्ष विठ्ठल शिंदे, ग्राहक सेल अध्यक्ष झेविअर अंथोनी, रोजगार व स्वयंरोजगार अध्यक्ष विशाल सरवदे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### अदानी-अंबानीसाठी अन्नदात्यांचा बळी...

**» माजी राज्यपाल मलिक यांनी केलेल्या आरोपांमुळे सर्वसामान्य जनतेच्या मनात संशय व संभ्रम निर्माण झाला आहे. तसेच अदानी समूहाच्या घोटाळ्याबद्दल, शेतकऱ्यांचे आयुष्य बर्बाद करणाऱ्या तीन काळ्या कायद्यांबद्दल, पीक विम्याच्या नावाखाली अदानी – अंबानी साठी अन्नदात्याचा बळी घेणारे व जनतेची तिजोरी लुटून देणारे कोण ? याबद्दल “जबाब दो मोदी, जबाब दो” हे आंदोलन करण्यात आले, असे डॉ. कैलास कदम यांनी सांगितले.**

काँग्रेसने निवेदनात उपस्थित केलेले प्रश्न – पुलवामा घटनेत केंद्र सरकारची अक्षम्य चूक झाली आहे, या वक्तव्यावर मलिक यांना गप्प राहण्यास का सांगितले गेले ? भारतीय जवानांना दुसरीकडे पाठविण्यासाठी विमानाची मागणी केली असता, ती का नाकारण्यात आली ? पुलवामा घटनेत वापरले गेलेले ३०० किलो आर. डी. एक्स. कुठून आले ? पुलवामा घटनेत ४० जवान धारातीर्थी पडले, हे भाजपा व नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणूक जिंकण्यासाठी केले होते का ?

मलिक यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संघटन महासचिव राम माधव यांनी ३०० कोटी रुपयांची ऑफर का दिली ? अदानी समूहाच्या घोटाळ्याबद्दल राहुल गांधी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे पंतप्रधान मोदींनी आज तागायत उत्तर दिली नाहीत ती द्यावीत.

शेतकऱ्यांचे आयुष्य बर्बाद करणाऱ्या तीन काळे कायद्यांबद्दल आणि हे काळे कायदे परत घेण्यासाठी आंदोलन करताना शहीद झालेल्या ७५० पेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या मृत्युला जबाबदार कोण ? याचे उत्तर पंतप्रधान मोदींनी द्यावे. पीक विम्याच्या नावाखाली अदानी-अंबानी साठी अन्नदात्याचा बळी घेणारे व जनतेची तिजोरी लुटून देणारे कोण ? याचे उत्तर पंतप्रधान मोदींनी द्यावे. वरील सर्व प्रश्नांची उत्तरे जनतेला मिळालीच पाहिजे आणि ‘ना-खाऊंग, ना-खाने दुंगा’ अशा गर्जना करणाऱ्या नरेंद्र मोदी यांनी या सर्व प्रश्नांचा खुलासा करून सत्य काय आहे, ते जाहीर केले पाहिजे.

---

# चापेकर बंधूंमुळे महान देशभक्तीचा वारसा!

## » अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप : स्मृतीदिनानिमित्त प्रशासनातर्फे अभिवादन

।पिंपरी।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

**थोर क्रांतिकारक हुतात्मा दामोदर हरी चापेकर यांचे भारतमातेवरील नितांत प्रेम, प्रखर देशभक्ती आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची जिद्द यांच्या सहाय्याने त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात १८९७ साली पुण्याचे प्लेग कमिशनर वॉल्टर चार्ल्स रँड यांची हत्या करून देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात सुवर्णाक्षरांनी लिहावी अशी कामगिरी केली असून चापेकर बंधूंच्या महान देशभक्तीचा वारसा सर्वांनी जोपासला पाहिजे असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने थोर क्रांतिकारक हुतात्मा दामोदर हरी चापेकर यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या चिंचवड येथील चापेकर बंधूंच्या समूह शिल्पास अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले त्यावेळी जगताप बोलत होते.

### तीन बंधुंच्या बलिदानाची एकमेव घटना...

**» अतिरिक्त आयुक्त जगताप म्हणाले चिंचवड येथील दामोदर हरी चापेकर यांनी बाळकृष्ण आणि वासुदेव या बंधूच्या साथीने पुण्यातील गणेशखिंड येथे २२ जून १८९७ रोजी जुलमी अधिकारी रँड आणि आयरिस्ट यांची हत्या केली आणि देशातील स्वातंत्र्यसैनिकांना, देशभक्तांना प्रेरणा दिली. या कृतीमुळे इंग्रजी सरकारने तीनही बंधूंना व त्यांचे सहकारी महादेव रानडे यांना फाशीची शिक्षा दिली. असे सांगून भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात एकाच घरातील तीन तरुण देशासाठी फासावर जाण्याची ही जगातील एकमेव घटना असल्याचेही अतिरिक्त आयुक्त जगताप म्हणाले.**

यावेळी पद्मश्री गिरीश प्रभुणे, माजी नगरसदस्य सुरेश भोईर, ॲड. मोरेश्वर शेडगे, माजी नगरसदस्या अश्विनी चिंचवडे, सहाय्यक आरोग्याधिकारी महादेव शिंदे, जनसंपर्क विभागाचे माहिती अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीचे कोषाध्यक्ष संजय कुलकर्णी, मधुसूदन जाधव, व्यवस्थापक अतुल आडे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने चिंचवड गाव येथे क्रांतिकारक हुतात्मा चापेकर बंधूंचे समूहशिल्प उभारण्यात आले आहे. तसेच श्रीराम आळी परिसरात चापेकारांचा जुना वाडा असून तेथे भव्य स्मारक उभारण्यात येत असून त्यांनी वापरलेल्या वस्तू आजही वाड्यात जतन करून ठेवलेल्या आहेत.

## संपादकीय »

# विरोधकांचं ऐक्य निवडणुकीपुरतंच?

***भाजपविरोधात एकीचा सूर विरोधकांकडून लावला जात असला तरी अद्याप त्यांच्यात एकमत होताना दिसत नाही. राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रा काढून लोकसभा निवडणुकीची तयारी सुरू केली, पण विरोधकांकडून त्यांच्या यात्रेला फारसा प्रतिसाद मिळू शकला नाही. अरविंद केजरीवाल आणि ममता बॅनर्जी काँग्रेससोबत जाण्याच्या मानसिकतेत दिसत नाहीत.***

महाराष्ट्रातील महाविकास आघाडीतही सर्वकाही आलबेल आहे, अशी स्थिती नाही. राहुल गांधींची स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दलची वक्तव्ये महाविकास आघाडीतील प्रमुख उद्धव ठाकरे गटाला त्रासदायक ठरत आहेत, तर राहुल गांधी आणि उद्धव ठाकरे यांनी हिंडेनबर्गप्रकरणी उद्योगपती गौतम अदानी यांच्या माध्यमातून थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधण्याचं सुरू ठेवलं आहे.

देशातील विरोधकही हिंडेनबर्गप्रकरणी नरेंद्र मोदींना टार्गेट करत असताना अचानक राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी वेगळीच भूमिका मांडली आहे. शरद पवार यांनी हिंडेनबर्गप्रकरणी आपली भूमिका जाहीर केल्यानंतर त्यावर ते ठाम राहिले आहेत. दुसरीकडे, काँग्रेस आणि उद्धव ठाकरेही हिंडेनबर्गप्रकरणी आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. त्यामुळेच महाराष्ट्रातील महाविकास आघाडीतील मतभिन्नता समोर आली आहे. ही मतभिन्नता वज्रमुठीसाठी नक्कीच घातक ठरू शकते. महाविकास आघाडीने वज्रमूठ सभेच्या माध्यमातून राज्यात शक्तिप्रदर्शनाला सुरुवात केली आहे. संभाजीनगरमध्ये झालेल्या पहिल्या वज्रमूठ सभेत विरोधकांमधील नाराजी समोर आली होती. त्या सभेला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले गैरहजर राहिले होते. त्यांच्या गैरहजेरीबद्दल खुलाशात महाविकास आघाडीतील नेत्यांमधील संवाद नसल्याचं दिसून आलं आहे.त्या सभेत उद्धव ठाकरे यांच्यासाठी असलेल्या वेगळ्या खुर्चीवरूनही तसंच त्या सभेत भारतमातेच्या प्रतिमेच्या पूजनावरूनही नाराजीचा सूर निघाला होता. ती चूक रविवारच्या नागपूर येथील वज्रमूठ सभेत सुधारण्यात आली. महाविकास आघाडीने भाजपच्या बालेकिल्ल्यात वज्रमूठ सभेच्या माध्यमातून जोरदार शक्तिप्रदर्शन केलं. त्यामुळे सभेला महाविकास आघाडीतील विविध पक्षातील प्रमुख नेत्यांची उपस्थिती अपेक्षित होती, पण माजी मुख्यमंत्री काँग्रेसचे नेते अशोक चव्हाण गैरहजर राहिले होते. आपल्या शहरातील वज्रमूठ सभेत काँग्रेसचे नेते नितीन राऊत यांचीही गैरहजेरी त्यांची नाराजी दाखवून गेली.

# हे कसले महाराष्ट्र भूषण ?




पैसा,सत्ता आणि बाहुबल एकत्र आले आणि दिल्लीच्या तख्तावर बसलेल्या बादशहाचा आशीर्वाद असला की काय होते त्याचे महाराष्ट्र सरकार हे उत्तम उदाहरण म्हटले पाहिजे. हे सरकार किती गतिमान आहे याचा साक्षात्कार तात्काळ जनतेला झाला आहे. ज्या गायिकेने संपूर्ण देश आणि अर्ध्या जगावर आपले स्वर साम्राज्य निर्माण केले त्या आशा भोसले याना महाराष्ट्र भूषण पुरस्कार वितरण सोहळा मुंबईत गेट वे ऑफ इंडियावर काही हजार लोकांच्या उपस्थितीत मागच्या महिन्यात उरकण्यात आला आणि ज्यांना कोकण वगळता कुणी फारसे ओळखत नाही ,जे धार्मिक प्रवचन वगळता काहीही करीत नाहीत,ज्यांनी आपल्या पंथात संपूर्ण परिवार सक्रिय केला ते आप्पा धर्माधिकारी यांचा पुरस्कार वितरण सोहळा मात्र मोठा सत्संग अन तोही सरकारी खर्चाने होतो हा मोठा विरोधाभास आहे.

राज्य सरकारच्यावतीने दिला जाणारा महाराष्ट्र पुरस्कार वितरणाचा सोहळा तब्बल ८ ते १३ जणांचा बळी घेऊन गेला आहे. कोकणातील रामदासी बैठकांचे जनक आप्पा धर्माधिकारी यांना यंदाचा हा पुरस्कार केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याहस्ते व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत देण्यात आला. परंतु, खारघरमधील खुल्या मैदानात आणि कडकडीत उन्हात घेण्यात आलेल्या या सोहळ्यात सावलीची कोणतीही सोय नव्हती, तसेच लाखोंच्या संख्येने आलेल्या धर्माधिकारी यांच्या अनुयायींची कोणतीही काळजी घेण्यात आली नव्हती. त्यामुळे शेकडो अनुयायींना उष्माघाताचा फटका बसला असून, त्यात आतापर्यंत ८ ते १३ जणांचा बळी गेला आहे. तसेच, शेकडोंवर वैद्यकीय उपचार करण्यात येऊन त्यांना सोडून देण्यात आले. तसेच, कामोठे येथील एमजीएम रूग्णालयात २५ जणांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले.

मुख्यमंत्री शिंदे यांनी रूग्णालयात जाऊन रूग्णांची भेट घेतली असून, मृतकांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाखांची मदत जाहीर केली आहे. राज्याच्या सांस्कृतिक सोहळ्याला हा पुरस्कार वितरण सोहळा गालबोट लावून गेल्याने राज्यात तीव्र संताप तसेच हळहळ व्यक्त केली जात आहे.मुळात सरकारला धर्माधिकारी यांच्या भक्तांना निमंत्रणे देऊन लाखांची गर्दी कशासाठी करायची होती ? पाच लाखांवर लोक भर उन्हात दिवसभर बसवताना त्यांच्या डोक्यावर कोणतीही सावली नाही,पाण्याची सोय नाही ,खेळती हवा असेल याचीही व्यवस्था नाही अशी सर्वत्र तक्रार असेल तर या सोहळ्यासाठी मंजूर करण्यात आलेला सुमारे १४ कोटी रुपयांचा निधी कुठे गेला ? पुरस्कार २५ लाखांचा आणि तो वितरित करायला खर्च १४ कोटींचा ,हे उरफाटे गणित शिंदे सरकार का करायला लागले आहे ?


कोकणातील लाखो कुणबी ज्यांनी आपल्या नादी लावले आहेत त्या धर्माधिकारी कुटुंबाची धार्मिक,अध्यामिक दादागिरी गेल्या पन्नास वर्षात निर्माण झाली आहे. प्रवचन करता करता अध्यामिक आणि दैवी पुरुष बनलेल्या अप्पा धर्माधिकारी यांनी एक हाक दिली की लोक कामधंदे सोडून धावत येतात याचा अनुभव राजकीय पक्षांना असल्याने महाराष्ट्र भूषण हा राजकीय सोहळा करण्यात आला आहे. गर्दी जमविण्याचे कसब असल्यामुळे आधी वडिलांना आणि आता मुलाला हा पुरस्कार देऊन सरकारने राजकीय गणित साधताना सरकारला रामदासी बैठकात नमवले आहे. हा सरकारी सोहळा न वाटता भाजपचा मेळावा अधिक वाटावा असे सगळे नियोजन दिसत होते. सरकारी निधीवर पक्षीय सोहळे कसे आयोजित करावेत याचे उत्तम कसब भाजपला जमले आहे.

मंचावर वातानुकूलित यंत्रणा बसवणाऱ्या सरकारने सामान्य भाविकांची कोणतीही व्यवस्था केली नाही त्याचा परिणाम असा झाला की शंभरावर लोकांना उन्हाचा तीव्र फटका बसला, पन्नास जणांना रुग्णालयात दाखल केल्यावर आता पर्यंत २० लोकांनी जीव गमावला आहे. ज्यांनी नाहक जीव गमावला ते सामान्य लोक आपल्या दैवी शक्ती असणाऱ्या धर्माधिकारी बुवाला ऐकण्यासाठी आणि दिव्य अनुभव घेण्यासाठी उन्हात बसलेले होते. हे बुवा मंचर थंड हवेची झुळूक घेत असतानाच तिकडे गर्दीत लोक उष्माघाताने मरत होते हा विरोधाभास राज्य सरकारच्या कोणत्याही अधिकाऱ्याला दिसू नये याची अतिशय लाज वाटते. सामान्य लोकांच्या मढ्यावर असले चमको सोहळे घेण्याचा नवा परिपाठ शिंदे सरकारने पाडून किमान लोकांची हाय तरी घेऊ नये. काळ जे काही घडले त्याला तरी महाराष्ट्र भूषण नक्कीच म्हणता येणार नाही.

# चोपन्न देशांचं आश्चर्य

**जगातील सर्वात जुन्या मानवी पाऊलखुणा, जगातील सर्वात जुनी मानवी संस्कृती आणि वसाहत, भारताच्या क्षेत्रफळापेक्षा लाभलेलं मोठं जंगल, जगातील सर्वात लांब नदी, अफाट मोठे धबधबे, जगातील अत्यंत दुर्मीळ जैवविविधता, हजारो वर्षांपासून इथे राहत असलेल्या आणि स्वतःचं वैविध्य टिकवून ठेवलेल्या हजारो जमाती, टोळ्या आणि त्यांच्या दोन हजारपेक्षा जास्त असलेल्या बोलीभाषा. तब्बल ५४ देशांनी बनलेला हा आहे आफ्रिका खंड. प्रसिद्ध लेखक जॉन हेमिंग्वेने म्हटलंय, " मी स्वतःच्या डोळ्यांनी बघितलेलं आश्चर्य म्हणजे आफ्रिका आहे."**

सुरुवात नक्की कुठून करावी, इतक्या साऱ्या गोष्टी आफ्रिकेमध्ये बघण्यासारख्या आहेत. इजिप्तचे पिरॅमिड आणि नाईल नदी, अल्जेरिया आणि ट्युनिशियामधील रोमन शहरांचे अवशेष, मोरोक्कोमधील कासाब्लांका, मारक्केश ही हजार वर्षांचा इतिहास लाभलेली जुनी शहरं, केनियामधील जंगल सफारी, आफ्रिकेतील सर्वात उंच असलेला टांझानियामधला किलीमांजारो पर्वत, इथिओपियामधील दनाकील डिप्रेशन आणि ओमो खोरे, झिम्बाब्वेमधील जगातील सर्वात उंच व्हिक्टोरिया धबधबा, जगातील सर्वात जुनी व्यापारी राजधानी झांझिबार, दक्षिण आफ्रिकेतील झुलू जमाती आणि जगप्रसिद्ध राष्ट्रीय उद्यानं, सेशेलस् आणि मॉरिशियसमधील सुंदर समुद्रकिनारे... अशा शेकडो गोष्टी सांगता येतील, ज्या आफ्रिकेमध्ये आवर्जून बघण्यासारख्या



आहेत आणि हा अनुभव आफ्रिकेबाहेर जगात कुठंही घेता येणार नाही. आफ्रिकेला पर्यटनासाठी निघण्याअगोदर चांगली पूर्वतयारी करणं आवश्यक आहे. शक्यतो आफ्रिकेसाठी दोन-तीन देशांचा प्लॅन एकत्र करावा, म्हणजे आफ्रिकेची एक बाजू पूर्ण करता येईल. गंमत म्हणजे आफ्रिकेतल्या आफ्रिकेत फ्लाइटचं जाळं फारसं चांगलं नाही; परंतु आफ्रिकेतल्या कोणत्याही भागात जाण्यासाठी युरोप किंवा मध्य आशियामधून बऱ्यापैकी चांगली व्यवस्था आहे.उदाहरणार्थ - इजिप्त करायचं झाल्यास जॉर्डनसोबत इजिप्त किंवा दुबईसोबत इजिप्त करता येऊ शकतं, कारण इथून विमानप्रवास तुलनेने बराच स्वस्त आहे. तुम्ही जर युरोप फिरत असाल आणि स्पेनला जाणार असाल, तर स्पेनच्या जिब्राल्टरपासून मोरोक्कोच्या टॅन्जीयरपर्यंत बोटीमार्गे फक्त अर्ध्या तासात पोहोचता येतं. शेजारी असलेले अल्जेरिया आणि ट्युनिशिया हे देशसुद्धा या दौऱ्यात पूर्ण होऊ शकतात. इटली आणि ग्रीसमधूनसुद्धा उत्तर आफ्रिकेतील देशांना स्वस्त फ्लाइट्स आहेत. भारतातूनसुद्धा फक्त केनिया, टांझानिया, इथिओपिया या देशांना थेट कनेक्टिव्हिटी आहे. आफ्रिकेमध्ये विमानप्रवास करणाऱ्या लोकांची संख्या फारच कमी असल्यामुळे मोठ्या मोठ्या एअरलाइन्स कमी आहेत आणि या उलट कमी प्रवासी क्षमता असलेली विमानं असलेल्या लहान विमान कंपन्या बऱ्याच आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# जीवात जीव असेपर्यंत राष्ट्रवादीमध्येच!

## भाजपसोबत जाणार नाही: अजित पवार यांची पत्रकार परिषदेमध्ये माहिती

।मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**माझ्याबद्दल आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील माझ्या सहकाऱ्यांबद्दल गैरसमज निर्माण करण्याचे काम सुरु आहे. वास्तविक ज्या बातम्या दाखवल्या जात आहेत, त्यामध्ये काही तथ्य नाही. मी राष्ट्रवादी काँग्रेसच्या ४० आमदारांच्या सह्या घेण्याचे कोणतेही कारण नाही. आम्ही सगळे राष्ट्रवादीत आहोत आणि राष्ट्रवादीतच राहणार आहोत. जोपर्यंत माझ्या जीवात जीव आहे तोपर्यंत मी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये राहणार, असे सांगत अजित पवार यांनी गेल्या काही दिवसांपासून भाजपसोबत जाणार असल्याच्या सुरु असलेल्या चर्चेवर पडदा टाकला. आपण सातत्याने माझ्याबद्दल बातम्या देत आहात, त्यामध्ये यत्किंचित तथ्य नाही, असेही अजित पवार यांनी सांगितले. ते मंगळवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.**

मी आज नेहमीप्रमाणे ऑफिसला बसलो होतो. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार नेहमीप्रमाणे कमिटीच्या मिटिंगला आले होते. त्यांची मंत्रालयात कामं होती. मी इकडे होतो म्हणून ते मला भेटायला आले. या आमदारांची माझ्याकडे काही कामं असतात. मात्र, गैरसमज पसरवणाऱ्या बातम्यांमुळे राष्ट्रवादीच्या स्थानिक स्तरावरील कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण होतो. पण त्यांनी काळजी करु नये. राजकारणात अनेक चढउतार येतात. महत्त्वाच्या प्रश्नांवरुन लक्ष विचलित करण्यासाठी जाणीवपूर्वक बातम्या पसरवल्या जात आहेत. मात्र, आता कोणतेही गैरसमज पसरवू नका. आता या विषयाचा तुकडा पाडा. हा विषय इथेच संपवा, असे अजित पवार यांनी म्हटले. मी नागपूरची वज्रमूठ सभा आटोपून येत असताना उद्धव ठाकरे यांच्यासोबत विमानातून आलो होतो. यावळी आमच्यात चर्चा झाली होती. तेव्हा मी त्यांना या सगळ्या चर्चांमध्ये काहीही तथ्य नसल्याचे स्पष्टपणे सांगितले होते, असेही अजित पवार यांनी सांगितले. परंतु, मध्यंतरी मी भाजपमध्ये जाणार अशा बातम्या यायला सुरुवात झाली तेव्हा उद्धव ठाकरे हे मी एकटाही लढेन, असे म्हटले. चुकीच्या बातम्यांमुळे हे गैरसमज निर्माण झाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची भूमिका महाविकास आघाडीत राहण्याची आहे. त्यामुळे महाविकास आघाडीची ताकद वाढवणे, हीच आमची भूमिका असल्याचे अजित पवार यांनी स्पष्ट केले.



### कार्यकर्त्यांना शब्द दिला, संशयाचं धुकं हटवलं

**» राज्याच्या राजकारणात मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय भूकंपाच्या चर्चांना पूर्णविराम देत राष्ट्रवादीचे नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. 'आम्ही आमचे नेते शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये काम करत आहोत आणि जोपर्यंत जीवात जीव आहे तोपर्यंत पक्षाचंच काम करणार. त्यामुळे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी मनात कोणताही संभ्रम न ठेवता निश्चिंत राहावे,' असं आवाहन अजित पवार यांनी केलं आहे.**

### पत्रकार परिषदेतील 10 मोठे मुद्दे

- सध्या आमच्याबाबत सुरू असलेल्या चर्चांमध्ये यत्किंचितही तथ्य नाही. सर्व बातम्या निराधार आहेत.
- कारण नसताना माझ्याबद्दल आणि माझ्या इतर सहकाऱ्यांबद्दल गैरसमज निर्माण करण्याचे काम जाणीवपूर्वक सुरू आहे.
- मी ४० आमदारांच्या सह्या घेतल्या, ही बातमी खोटी आहे.
- आम्ही परिवार म्हणून काम करतो, यापुढेही पक्षाचं काम सुरू ठेवणार.
- कार्यकर्त्यांनी संभ्रमित न होता आपआपल्या भागात पक्षवाढीसाठी काम सुरू ठेवावं.
- मला आज काही आमदार भेटले. ते त्यांच्या मतदारसंघातील कामांबाबत भेटले, अन्य कोणताही हेतू नाही.
- राज्यासमोर बेरोजगारी, महागाई यांसारखे महत्त्वाचे प्रश्न आहेत. अशा प्रश्नांवरून लक्ष विचलित करण्यासाठी जाणीवपूर्वक अशा चर्चा घडवून आणल्या जात आहेत.
- मी राष्ट्रवादी सोडून जाणार नाही, हे पत्रकारांना स्टॅम्प पेपरवर लिहून देऊ का?
- महाविकास आघाडीसोबत राहून ही आघाडी मजबूत करण्याचा निर्णय राष्ट्रवादीने घेतलेला आहे.
- मी ट्विटरवरून पक्षाचं चिन्ह हटवलेलं नाही. आता काय कपाळावर पक्षाचं चिन्ह लावून फिरू का?

# "अमित शाह, एकनाथ शिंदे आणि फडणवीसांनी १३ लोकांची हत्या केली"

## एमआयएमचे खासदार इम्तियाज जलील यांचा गंभीर आरोप

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर एमआयएमच्या नेत्याने गंभीर विधान केलं आहे.

महाराष्ट्र सरकारने अलीकडेच आप्पासाहेब धर्माधिकारी यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार दिला. हा पुरस्कार सोहळा रखरखत्या उन्हात आयोजित केला होता. या कार्यक्रमाला लाखो लोक उपस्थित होते. कार्यक्रमस्थळी लोकांना भरउन्हात तब्बल तीन तास बसावं लागलं. यामध्ये १३ लोकांचा उष्माघाताने मृत्यू झाला. याच पार्श्वभूमीवर एमआयएमचे खासदार इम्तियाज जलील यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. संबंधित तिघांनी १३ लोकांची हत्या केली, असं त्यांनी म्हटलं आहे.



'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराच्या कार्यक्रमात घडलेल्या उष्माघात प्रकरणावर भाष्य करताना इम्तियाज जलील म्हणाले की, "आप्पासाहेब धर्माधिकारी यांचं काम खूप मोठं आहे. त्यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार मिळाला, यासाठी मी त्यांचं अभिनंदन करतो. पण हा पुरस्कार देण्यासाठी जो कार्यक्रम घेण्यात आला, या कार्यक्रमाला धर्माधिकारी यांचे २० लाख अनुयायी बोलवण्यात आले होते. त्यांच्या मतांसाठी हा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी १४ कोटी रुपये खर्च केले, असं मला सांगण्यात आलं."

"या कार्यक्रमात स्वत:ला घाम येऊ नये, म्हणून तुम्ही (अमित शाह, एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस) शेडमध्ये बसले होते. पण लाखोंच्या संख्येनं कार्यक्रमाला उपस्थित राहणाऱ्या गोर-गरीब अनुयायांना तुम्ही उन्हात बसवलं. यामध्ये १३ लोकांचा बळी गेला, हा बळी गेला नाही तर हत्या झाली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी या हत्या केल्या," असं गंभीर विधान जलील यांनी केलं.

### प्रत्येकी 50 लाख रुपये मदत करा

**» "त्यांनी आपली जबाबदारी खूप चांगल्या पद्धतीने पार पाडली. तुम्ही गरीब लोक आहात, तुम्ही मेलात तर काय फरक पडणार नाही. आम्ही तुम्हाला सरकारी तिजोरीतून पाच लाख रुपये देतो. पण तुम्हाला लाज वाटायला हवी. माणसाची किंमत तुम्ही पाच लाख रुपये इतकी केली. तुम्हाला थोडीतरी लज्जा असेल तर पीडित कुटुंबियांना प्रत्येकी ५० लाख रुपये मदत करा. आपल्या राजकीय स्वार्थासाठी तुम्ही लोकांचा बळी घेतला. यासाठी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी तर राजीनामा द्यायला हवा होता. हीच घटना परदेशात घडली असती तर व्यासपीठावर बसलेला तिन्ही जणांना राजीनामा द्यावा लागला असता. पण तुम्ही राजीनामा देणार नाहीत," अशी टीका जलील यांनी केली.**

# यूपीत उत्तम कायदा सुव्यवस्था!

## अतिक-अशरफच्या हत्येनंतर मुख्यमंत्री योगींचं मोठं वक्तव्य

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**अतिक आणि अशरफ अहमदच्या हत्येनंतर उत्तर प्रदेशमधील कायदा आणि सुव्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. मात्र, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. उत्तर प्रदेशात आता दंगली होत नाहीत. उत्तर प्रदेशात कायद्याचं राज्य आहे. आता कोणताही गुन्हेगार किंवा माफिया कोणत्याही उद्योजकाला धमकावत नाही, उत्तर प्रदेश सरकार तुम्हाला उत्तम कायदा सुव्यस्थेची खात्री देतं, असं योगी आदित्यनाथ म्हणाले. एएनआयने यासंदर्भातील वृत्त दिले आहे.**

"जे माफिया आधी राज्यासाठी संकट होते, आता ते स्वतः संकटात आहेत. आमच्या काळात उत्तर प्रदेशात एकदाही संचारबंदी लागलेली नाही. कोणत्याही रस्त्यावर आता भीती वाटत नाही. उत्तर प्रदेश आता विकासासाठी ओळखलं जातं.

पूर्वी उत्तर प्रदेशमधील कायदा सुव्यवस्था खराब होती", असंही ते म्हणाले. जिथे रस्त्यांवर खड्डे दिसायला सुरुवात झाली तिथून उत्तर प्रदेशची सीमा सुरू झाली, असं पूर्वी म्हटलं जायचं. उत्तर प्रदेशची आंतरराज्यीय कनेक्टिव्हिटी आम्ही जोडली आहे, असंही ते पुढे म्हणाले.



### अतिक-अशरफ हल्लाप्रकरण नेमकं काय?

**» अतिक अहमद आणि अशरफ अहमद याची शनिवारी हत्या करण्यात आली. या दोघांना अस्वस्थ वाटू लागल्याने पोलिसांनी त्यांना प्रयागराज येथील रुग्णालयात नेलं. रुग्णालयात जात असताना प्रवेशद्वाराजवळच माध्यम प्रतिनिधींनी या दोघांना प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. हे दोघेही काही बोलणार इतक्यात त्यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. माध्यम प्रतिनिधींच्या घोळक्यात असणाऱ्या दोघांनीच या दोघांवर गोळ्या झाडल्या. या गोळीबारामुळे अतिक आणि अहमदचा जागीच मृत्यू झाला. गोळीबारानंतर हल्ला करणारे दोघेजण आणि त्यांचा एक साथीदार पोलिसांना शरण गेले.**

# जातीनिहाय जनगणना करा!

## मल्लिकार्जून खरगे : ओबीसी मतांसाठी काँग्रेसची मोर्चेबांधणी

। नवी दिल्ली : । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**काँग्रेसने देशात जातीनिहाय जनगणना करण्याची मागणी केली असून पक्षाध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी सोमवारी याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठविले. राष्ट्रीय जनता दलाचे नेते आणि बिहारचे उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनीही या मागणीला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या जातीनिहाय जनगणनेच्या मागणीला बळ मिळाले आहे.**



संसदेमध्ये भाजपच्या काही खासदारांसह जनता दल (संयुक्त), राष्ट्रीय जनता दल, राष्ट्रवादी काँग्रेस आदी प्रादेशिक पक्षांसह काँग्रसने जातीनिहाय जनगणनेची मागणी यापूर्वीच केली होती. भाजपने ही मागणी फेटाळली आहे. खरगे यांनी आपल्या पत्रात याचा उल्लेख केला आहे. २०११-१२मध्ये तत्कालीन संयुक्त पुरोगामी आघाडी (यूपीए) सरकारने सामाजिक व आर्थिक तसेच, जातीनिहाय सर्वेक्षण केले होते. त्यामध्ये २५ कोटी कुटुंबांचा समावेश होता. २०१४ मध्ये केंद्रात भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सरकार सत्तेत आल्यानंतर जातीनिहाय जनगणनेचे आकडे प्रसिद्ध केले गेले नाहीत.

सामाजिक न्यायासाठी नवा माहिती-विदा आवश्यक असून त्यासाठी जातीनिहाय जनगणना झाली पाहिजे, असे खरगेंनी पत्रात नमूद केले आहे. २०१४ व २०१९ मधील लोकसभा निवडणुकीत तसेच, उत्तर प्रदेश व अन्य राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत ओबीसी मतदार भाजपचा प्रमुख आधार राहिले आहेत. दलित, आदिवासी तसेच ओबीसी मतदारांनी काँग्रेसपासून फारकत घेतल्यामुळे दोन्ही लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या मतांचा टक्का घसरला. ही घसरण रोखण्यासाठी काँग्रेसने जातीनिहाय जनगणनेची मागणी लावून धरली आहे. भाजपच्या हिंदूत्वाला छेद देण्यासाठी तसेच आगामी कर्नाटक विधानसभा निवडणुकीत ओबीसी जनगणनेचा मुद्दा उपयुक्त ठरेल, अशी काँग्रेसला अपेक्षा आहे. रायपूरच्या महाअधिवेशनामध्येही पक्षांतर्गत ५० टक्के आरक्षण देऊन ओबीसी, दलित व आदिवासींना पदे देण्याची घोषणा काँग्रेसने केली होती.

### ओबीसी-कोलारचा 'योगायोग'

»काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी कर्नाटकमधील कोलारमध्ये अलीकडेच घेतलेल्या प्रचारसभेत ओबीसी जनगणनेची मागणी पुन्हा एकदा केली. २०१९च्या लोकसभा निवडणूक प्रचारावेळी तेथे झालेल्या सभेतच 'सगळय़ा चोरांचे आडनाव मोदीच कसे असते' असे विचारले होते. या विधानाचा वापर ओबीसी मतांच्या बळकटीसाठी भाजपकडून केला जात होता.

# ब्रिटनमध्ये गुजराती लोकप्रतिनिधी गट स्थापण्यास भारतीयांचा विरोध!

। लंडन । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



ब्रिटनमधील भारतीय समुदायाच्या अनेक संघटनांनी ब्रिटिश गुजरातींसाठी नवीन सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी गट स्थापन करण्यावर आक्षेप घेणारी पत्रे प्रसृत केली आहेत. 'हे पाऊल विभाजनकारी ठरू शकते,' असा आक्षेप इतर भारतीय समुदायांनी घेतला आहे.' 'ब्रिटिश गुजराती ऑल पार्टी पार्लमेंटरी ग्रुप' (एपीपीजी) या नावाने या नव्या गटाची नोंदणी करण्यात आली. त्याद्वारे ब्रिटिश गुजराती समुदायाच्या आर्थिक, आरोग्य, सामाजिक आणि सांस्कृतिक गरजा ब्रिटिश प्रतिनिधीगृहात मांडल्या जाव्यात. विशेषतः या समुदायासाठी आरोग्य सुविधा,

शिक्षण आणि ज्येष्ठ नागरिकांची देखभाल याबाबतचे प्रश्न मांडण्यावर भर देण्यात यावा, या उद्देशाने हा गट स्थापण्यात आला आहे. ब्रिटिश प्रतिनिधीगृहांत अशा लोकप्रतिनिधी गटांना वेगळे स्थान नसते. मात्र हे सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी तयार केलेले अनौपचारिक गट असतात. विशिष्ट प्रदेश, विशिष्ट धोरणांत समान स्वारस्य असलेली मंडळी यात एकत्र येतात. ब्रिटनमधील 'फ्रेंड्स ऑफ इंडिया सोसायटी इंटरनॅशनल'ने (एफआयएसआय) या नव्या गटाच्या सदस्यांना गेल्या आठवडय़ात पाठवलेल्या पत्रात नमूद केले, की हे पाऊल विभाजनकारी आणि ब्रिटिश भारतीय समुदायाच्या हिताच्या विरुद्ध असल्याचे आमचे मत आहे. असा गट स्थापण्यामागे कोणतेही सयुक्तिक कारण आम्हाला समजू शकलेले नाही. कारण या गटाने उपस्थित केलेल्या चिंता इतर ब्रिटिश भारतीय समुदायाच्या समस्यांपेक्षा वेगळय़ा नाहीत.

### 'भारताच्या एकात्मतेवर घाला'

**»ब्रिटनमधील 'फ्रेंड्स ऑफ इंडिया सोसायटी इंटरनॅशनल'ने (एफआयएसआय) म्हटले आहे की, अशा नव्या गटाची स्थापना करणे म्हणजे ब्रिटिश भारतीय समुदायाच्या आणि पर्यायाने भारताच्या एकात्मतेवर घाला घालण्यासारखे आहे. व्यापक हिंदू/भारतीय समुदायात कलह निर्माण करणाऱ्या अशा बेताल आणि अधर्मी प्रयत्नांना परावृत्त करणे आवश्यक आहे, असेही या पत्रात म्हटले आहे. 'हिंदू फोरम ऑफ ब्रिटन' (एचएफबी), 'ब्रिटिश शीख असोसिएशन' आणि ब्रिटिश गुजराती समुदायाचे प्रतिनिधित्व करणारी 'नॅशनल असोसिएशन ऑफ पाटीदार समाज' या सारख्या भारतीय समुदायाच्या संघटनांनी या संदर्भात प्रसृत केलेल्या पत्रांतही अशाच भावना व्यक्त केल्या आहेत.**

## आरती मित्तल अशी अडकली पोलिसांच्या जाळ्यात



सोमवारी 17 एप्रिल,2023 रोजी क्राइम ब्रान्च युनिट ११ ने कारवाई करत फिल्म इंडस्ट्रीत चालणाऱ्या एका सेक्स रॅकेटचा भांडाफोड केला आहे. हे सेक्स रॅकेट बॉलीवूडची कास्टिंग डायरेक्टर आरती मित्तल चालवायची असं प्राथमिक तपासात समोर आलं आहे,अशी माहिती मुंबईच्या क्राइम ब्रान्चनं दिली.

गोरेगावमधील एका ठिकाणाहून दोन मॉडेल्सना या सेक्स रॅकेटच्या जाळ्यातून वाचवण्यात आलं आहे आणि त्यांना त्यांच्या घरी सुखरूप पाठवण्यात आलं. मॉडेल्सनी पोलिसांना सांगितलं की आरतीनं त्यांना १५-१५ हजार रुपये देण्याचा शब्द दिला होता.पोलिसच खोटे ग्राहक बनून हॉटेलमध्ये गेले होते आणि त्यानंतर सेक्स रॅकेटचा भांडाफोड केला गेला. आरती मित्तलला याप्रकरणात ताब्यात घेण्यात आलं आहे. क्राइम ब्रान्चच्या काही अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार पोलिस इन्स्पेक्टर मनोज सुतार यांना या सेक्स रॅकेटची माहिती मिळाली होती.

त्यानंतर त्यांनी एक टीम बनवली आणि त्यातील एकाला ग्राहकाच्या रुपात पाठवलं. त्यानंतर आरती मित्तलला तिथं बोलावलं गेलं आणि त्याच्या मित्रांसाठी दोन मुली हव्या आहेत असं सांगितलं.आरतीनं त्यासाठी ग्राहक बनून गेलेल्या पोलिसांकडे ६० हजार रुपयांची मागणी केली. आरता जेव्हा मुलींच्या बदल्यात ६० हजार रुपयांचं डील करत होती ती योग्य संधी साधून पोलिसांनी तिला पकडलं. आरती कास्टिंग डायरेक्टरच नाही तर अभिनेत्री देखील आहे. तिनं 'अपनापन' सारख्या मालिकेमधनं काम केलं आहे. त्या शो मध्ये प्रसिद्ध अभिनेत्री राजश्री ठाकूर मुख्य पात्र साकारत होती. काही दिवस आधी आरतीनं सोशल मीडियावर पोस्ट केली होती की ती लवकरच आर माधवनसोबत सिनेमाच्या शूटिंगला सुरुवात करणार आहे.

## यंदाचा 'लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार' आशा भोसलेंना जाहीर



यंदाच्या 'लता दीनानाथ मंगेशकर' पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. ज्येष्ठ गायिका आशा भोसले या पुरस्काराच्या मानकरी ठरल्या आहेत. गायिका उषा मंगेशकर यांनी या पुरस्कारांची घोषणा केली. शिवाय, विद्या बालन, पंकज उदास, प्रसाद ओक यांच्यासह अनेकांना मास्टर दीनानाथ मंगेशकर पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. दिवंगत मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या ८१ व्या स्मृतिदिनानिमित्त नुकतंच एक प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले. या प्रसिद्धीपत्रकानुसार यंदाचा लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना जाहीर करण्यात आला आहे. तर चित्रपट आणि नाटक क्षेत्रातील योगदानासाठी अभिनेता प्रसाद ओकला विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच चित्रपट क्षेत्रातील योगदानासाठी अभिनेत्री विद्या बालन विशेष पुरस्कार दिला जाणार आहे. मंगेशकर कुटुंब गेल्या ३३ वर्षांपासून मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठान, पुणे हा सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट चालवत आहेत. मंगेशकर प्रतिष्ठानतर्फे संगीत, नाटक, कला, वैद्यकीय, व्यावसायिक आणि सामाजिक कार्य क्षेत्रातील दिग्गजांचा सत्कार केला जातो.

येत्या २४ एप्रिल २०२३ रोजी यंदाचा प्रतिष्ठित दीनानाथ पुरस्कार आणि ट्रस्टच्या इतर पुरस्कारांचा वितरण सोहळा पार पडणार आहे. मुंबईतील सायन याठिकाणी असणाऱ्या श्री षण्मुखानंद हॉल इथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. गतवर्षीपासून, मंगेशकर कुटुंबीय आणि ट्रस्टकडून भारतरत्न लता दीदींच्या स्मरणार्थ 'लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार' दिला जातो. हा पुरस्कार दरवर्षी फक्त एकाच व्यक्तीला दिला जातो. आपल्या राष्ट्रासाठी, लोकांसाठी आणि समाजासाठी अतुलनीय, नेत्रदीपक आणि अनुकरणीय योगदान देणाऱ्या व्यक्तिला हा पुरस्कार दिला जाणार आहे. गेल्यावर्षी या पुरस्काराचे मानकरी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी ठरले होते. यावर्षी 'लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार' लतादीदींच्या लहान बहिणीला अर्थात ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना दिला जाणार आहे. पंडित हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात येणार आहे.

## परिणीती चोप्राने राघव चड्ढा सोबत केली एंगेजमेंट?

**आम आदमी पार्टीचे नेते राघव चड्ढा यांच्यासोबत लग्नाच्या अफवांदरम्यान, बॉलीवूड अभिनेत्री परिणीती चोप्राने तिच्या रिंग फिंगरमध्ये सिल्व्हर बँड घातलेली दिसली. राजकारणी राघव चड्ढा यांना डेट करत असल्यामुळे ही अभिनेत्री बऱ्याच दिवसांपासून चर्चेत आहे. दोघांनीही त्यांच्या नात्याबाबत मौन बाळगले आहे.**

सोमवारी रात्री परिणीतीच्या अंगठीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तिचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे, त्या व्हिडीओत तिच्या हातात अंगठी दिसत आहे. तिच्या हातातील अंगठी पाहून त्यांनी एंगेजमेंट केली असावी, अशी शक्यता वर्तवली जात आहे.



अभिनेत्री सोमवारी रात्री सेलिब्रिटी मॅनेजर पूनम दमानिया यांच्या ऑफिसमध्ये स्पॉट झाली होती. यादरम्यान परिणीतीने जीन्स आणि क्रॉप टॉप घातला होता. परिणीती कॅज्युअल लूकमध्ये खूपच आकर्षक दिसत होती.ऑफिसमधून बाहेर पडण्यापूर्वी अभिनेत्रीने कॅमेऱ्यासमोर स्माईलही दिली.

दुसरीकडे, राघव चड्ढा यांनी पत्रकारांशी नुकत्याच झालेल्या भेटीत आपल्या रुमर्ड वेडिंगवरील प्रश्न चतुराईने टाळले. मात्र, अलीकडेच गायक-अभिनेता हार्डी संधूने परिणीती आणि राघव चड्ढा यांच्या नात्याला दुजोरा दिला होता. हे दोघे लवकरच लग्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## शहनाजला इग्नोर करणे जान्हवीला पडले महागात...







शहनाज गिल सलमान खानच्या 'किसी का भाई किसी की जान' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पाऊल ठेवणार आहे. शहनाज गिलने चित्रपटांमध्ये पदार्पण करण्याआधीच स्वत:साठी चांगले नाव कमावले आहे. तिचे व्हिडीओ दररोज सोशल मीडियावर व्हायरल होतात यावरून तिच्या चाहत्यांमध्ये लोकप्रियतेचा अंदाज लावता येतो. शहनाजचा एक व्हिडिओ पुन्हा चर्चेत आला आहे. या प्रकरणात चाहत्यांनी जान्हवी कपूरची शाळा घेतली आहे. व्हायरल व्हिडिओ एका इव्हेंटचा आहे. यामध्ये शहनाज गिल, पूजा हेगडे आणि जान्हवी कपूर एकत्र बसलेल्या दिसत आहेत. यादरम्यान जान्हवी कपूर अभिनेत्री पूजा हेगडेसोबत खूप बोलताना दिसत आहे. पण, मध्ये बसलेली शहनाज जेव्हा जान्हवीशी बोलण्याचा प्रयत्न करते तेव्हा जान्हवी तिला इग्नोर करताना दिसते.

व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर शहनाज गिलचे चाहते जान्हवी कपूरला खूप ट्रोल करत आहेत. एका यूजरने लिहिले, 'जान्हवी शहनाजला का इग्नोर करतेय?' 'नेपोकिड्सचा ॲटिट्यूड बघा' अशी कमेंट आणखी एका युजरने केली.

त्याचवेळी एका यूजरने लिहिले की, 'बघा, एक दिवस शहनाज गिल बॉलिवूडची राणी बनेल.' मात्र, जान्हवी ट्रोल झाल्यावर तिचे काही चाहतेही मदतीला आले. एका यूजरने लिहिले की, 'शहनाज जास्त ओव्हरॲक्टिंग करते, जान्हवीने कोणाला इग्नोर केले नाही.'शहनाज गिल सध्या सलमान खानच्या 'किसी का भाई किसी की जान' मुळे खूप चर्चेत आहे. अलीकडेच शहनाजने हिंदी चित्रपटसृष्टीत सलमानसोबत काम करण्याचा अनुभव सांगितला.

शहनाज म्हणाली होती की, 'तो 'बिग बॉस'च्या मंचावर दिसतो तसाच आहे. मला त्यात काही फरक दिसत नाही. तो इतरांना चांगला सल्ला देतो आणि त्यांना प्रेरित करतो.

# मुंबई इंडियन्सची हॅटट्रिक!

## हैदराबादवर 14 धावांनी रोमांचक विजय

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर मुंबईने १४ धावांनी विजय मिळवला. या सामन्यात मुंबईने २० षटकांत पाच गडी गमावून १९२ धावा केल्या. प्रत्युत्तरात हैदराबादचा संघ १९.५ षटकांत १७८ धावांत सर्वबाद झाला.**



स्पोर्ट्स राजीव गांधी क्रिकेट स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या आयपीएलच्या २५व्या सामन्यात मुंबई इंडियन्सने हैदराबादचा १४ धावांनी पराभव करत विजयाची हॅटट्रिक नोंदवली. हैदराबादसमोर विजयासाठी १९३ धावांचे लक्ष्य होते, परंतु संपूर्ण संघ १९.५ षटकांत १७८ धावांत सर्वबाद झाला. हैदराबादला शेवटच्या षटकात २० धावांची गरज होती, पण अर्जुन तेंडुलकरने केवळ ४ धावा दिल्या. त्याने आपल्या आयपीएल कारकिर्दीतील पहिली विकेटही घेतली. २०व्या षटकाच्या ५व्या चेंडूवर त्याने भुवनेश्वर कुमारला कर्णधार रोहित शर्माकरवी झेलबाद केले.

हैदराबादकडून मयंक अग्रवालने सर्वाधिक ४८ तर हेनरिक क्लासेनने १६ चेंडूत ३६ धावांची स्फोटक खेळी केली. तत्पूर्वी, नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने कॅमेरून ग्रीनच्या ६४ आणि इशान किशनच्या ३८ धावांच्या जोरावर ५ गडी गमावून १९२ धावा केल्या. सनरायझर्स हैदराबादचा डाव –

१९३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना सनरायझर्स हैदराबादची सुरुवात चांगली होऊ शकली नाही. त्यांनी अवघ्या ११ धावांवर पहिली विकेट गमावली. गेल्या सामन्यातील शतकवीर हॅरी ब्रूक ९ धावा करून बाद झाला. बेहरेनडॉर्फने त्याला सूर्यकुमार यादवकरवी झेलबाद केले. लवकरच हैदराबादला आणखी एक धक्का बसला जेव्हा राहुल त्रिपाठी ७ धावा करून बेहरेनडॉर्फच्या चेंडूवर ईशान किशनकरवी झेलबाद झाला.

### मुंबई इंडियन्सचा डाव

**प्रथम फलंदाजी करताना मुंबईने सनरायझर्स हैदराबादसमोर १९३ धावांचे लक्ष्य ठेवले होते. मुंबईकडून कॅमेरून ग्रीनने सर्वाधिक ६४ धावांची खेळी खेळली. ग्रीनशिवाय तिलक वर्माने १६ चेंडूत ३७ धावा केल्या. तत्पूर्वी, रोहित शर्मा आणि इशान किशन यांनी मुंबईच्या डावाची सुरुवात केली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी ४.४ षटकात ४१ धावा जोडल्या. यादरम्यान रोहित शर्माने आयपीएल कारकिर्दीतील ६ हजार धावा पूर्ण केल्या. त्याला टी नटराजनने २८ धावांवर बाद केले.**

मयंक अग्रवाल आणि मार्कराम यांनी तिसऱ्या विकेटसाठी ४६ धावा जोडल्या, परंतु २२ च्या वैयक्तिक धावसंख्येवर तो ग्रीनच्या चेंडूवर हतिक शोकीनकरवी झेलबाद झाला. अभिषेक शर्माही लगेच १ धावा काढून बाद झाला. परंतु क्लासेन आणि अग्रवाल यांनी ५व्या विकेटसाठी झटपट ५५ धावा जोडून हैदराबादला सामन्यात ठेवले होते. क्लासेनने १६ चेंडूत ३६ धावांची स्फोटक खेळी खेळली. त्याला पियुष चावलाने बाद केले.

ग्रीन आणि इशान किशन यांनी दुसऱ्या विकेटसाठी ४६ धावांची भागीदारी केली, पण किशनचे अर्धशतक हुकले. मार्को जॅनसेनने ३८ धावांवर त्याला बाद केले. मुंबईला तिसरा धक्का सूर्यकुमार यादवच्या रूपाने बसला जो ७ धावा काढून बाद झाला. तिलक वर्मा आणि ग्रीन यांनी चौथ्या विकेटसाठी झटपट ५६ धावा जोडल्या, पण १६ चेंडूत ३७ धावांची स्फोटक खेळी खेळल्यानंतर तिलक भुवनेश्वर कुमारच्या चेंडूवर मयंक अग्रवालच्या हाती झेलबाद झाला.

---

# सूर्यकुमारनंतर हरमनप्रीत कौरने केली मोठी कामगिरी

## 16 वर्षांनंतर मिळणार हा विशेष सन्मान

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**या दोन देशांमध्ये आयपीएलची जबरदस्त क्रेझ सुरू आहे आणि दररोज प्रत्येक सामन्यातील धडाकेबाज खेळी पाहण्यासाठी सर्व चाहते रोमांचित झाले आहेत. दरम्यान, चाहत्यांना आनंदाने उड्या मारण्याची संधी देणारी बातमी आली असून यामध्ये महिला आणि पुरुष क्रिकेटपटूंची चर्चा झाली. तसेच, या खेळाडूने भारतीय महिला क्रिकेटच्या वतीने इतिहास रचला आहे, कारण पहिल्यांदाच महिला खेळाडूने विस्डेन क्रिकेट पुरस्काराच्या यादीत स्थान मिळवले आहे.**





**हरमनप्रीत कौरने इतिहास रचला, विस्डेनमध्ये नामांकन**

भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर ही १८८९च्या परंपरेनुसार विस्डेन व्यवस्थापनाने निवडल्याप्रमाणे 'विस्डेन क्रिकेटर्स ऑफ द इयर' म्हणून नावाजलेली पहिली भारतीय महिला क्रिकेटपटू ठरली आहे. या यादीतील इतर खेळाडूंबद्दल बोलायचे झाले तर त्यात न्यूझीलंडचे टॉम ब्लंडेल आणि डॅरिल मिशेल आणि त्यांच्यासोबत इंग्लंडचे बेन फोक्स आणि मॅथ्यू पॉट्स आहेत.हरमनप्रीत कौरने या यादीत स्थान मिळवण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे कँटरबरी येथे १११ चेंडूत १४३ धावांची तिची शानदार खेळी ज्यामुळे भारताला १९९९ नंतर इंग्लिश भूमीवर पहिली वन डे मालिका जिंकण्यात मदत झाली. हरमनप्रीतने बर्मिंगहॅम येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या अंतिम फेरीतही भारताचे नेतृत्व केले. सबमिट वर्ग सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून पराभूत झाल्यानंतर भारताला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले.

यामध्ये गेल्या वर्षी सूर्यकुमार यादव याला नामांकन देण्यात आलं आहे

हरमनप्रीत कौरच्या आधी सूर्यकुमार यादवनेही विस्डेनच्या या यादीत आपले आकर्षण पसरवले आहे. सूर्यकुमार यादवला गेल्या वर्षी त्याच्या अप्रतिम कामगिरीचे बक्षीस मिळाले होते. त्याची 'विस्डेन टी२० क्रिकेटर ऑफ द इयर' म्हणून निवड झाली. २०२२ मध्ये, एका वर्षात १,००० टी२० आंतरराष्ट्रीयमध्ये धावा करणारा सूर्या हा केवळ दुसराचं खेळाडू ठरला. त्याने नॉटिंगहॅम येथे इंग्लंडविरुद्ध आणि माऊंट मौनगानुई येथे न्यूझीलंडविरुद्ध दोन शानदार शतके झळकावली.

### 'या' महिला क्रिकेटपटूंचीही नावे समोर आली

**यामध्ये हरमनप्रीत कौर व्यतिरिक्त अनेक महिला क्रिकेटपटूंनी नामांकन मिळाले आहेत. विस्डेनच्या या यादीत ऑस्ट्रेलियाची फलंदाज बेथ मुनीचा समावेश आहे, जिने गेल्या तीन वर्षांत दुसऱ्यांदा येथे आपले नाव नोंदवले आहे. त्याने ऑस्ट्रेलियाला ५०-षटकांच्या आणि २०- षटकांच्या दोन्ही स्पर्धांमध्ये विश्वचषक जिंकून देणारी तसेच २०२२ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक मिळवणारी ती यशस्वी कर्णधार आहे. त्यामुळे त्यांचाही समावेश करण्यात आला.**